जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - दिनांक - १६/१२/२०२४**

लष्कर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## रात्रीचे वेळी प्रवाशांची लुटमार करणा-या तडीपार आरोपीला दोन साथीदारांसह केले जेरबंद

दि.१५/१२/२०२४ रोजी फिर्यादी हे खाजगी ट्रॅव्हल बसने लातुर येथुन पुण्यामध्ये आल्यानंतर ते म. गांधी बस स्टॉप जवळ उतरून पायी चालत बस स्टॉपकडे जात असताना त्यांना पोलीस रेकॉर्ड वरील तडीपार गुन्हेगार नामे **छोट्या उर्फ अभिषेक शिवाजी आल्टे वय २३ वर्षे रा. बाबाजान चौक कॅम्प, पुणे व त्याचे साथीदार १)अमर विशाल खरात,वय १९ वर्षे रा. साईबाबा मंदिरा समारे कॅम्प,पुणे २)जयेश गणेश भिसे,वय १९ वर्षे रा. लक्ष्मीमाता मंदिरामागे काशेवाडी,पुणे** यांनी मोटार सायकलवर ट्रिपल सीट येवुन फिर्यादीस रस्त्यामध्ये अडवुन मारहाण करून त्यांचा मोबाईल फोन जबरदस्तीने चोरून नेला म्हणुन लष्कर पोलीस स्टेशन,पुणे शहर गुन्हा रजि. नंबर २८८/२०२४, भा. न्या.सं.कलम ३०९(४),३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन दाखल गुन्हयाचे तपासादरम्यान तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी नमुद वरिल आरोपीतास शोध घेवुन दाखल गुन्ह्यात अटक केली आहे.

दाखल गुन्हयात ताब्यात घेतलेल्या आरोपीतांकडे अधिक चौकशी केली असता, आरोपींकडे खालीलप्रमाणे दाखल दोन गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या दोन मोटार सायकली व एक मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत, त्याबाबत लष्कर पोलीस स्टेशन गुन्हे अभिलेखावर पडताळणी करून पाहिले असता लष्कर पोलीस ठाणे गु. र. क्र. १२८/२०२४, भा. द. वि. कलम ३७९, तसेच इतर पोलीस स्टेशन गुन्हे अभिलेखावर पडताळणी केली असता, मुंढवा पोलीस ठाणे गु. र. क्र. ४२७/२०२४, भा. न्या. सं. कलम ३०३(२) असे इतर दोन गुन्हे केले असल्याचे तपासात उघडकिस आले आहे. सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेली अशी दोन वाहने एकुण ८०,०००/-रु.किं.ची आरोपीतांकडुन हस्तगत करण्यात आली आहेत. सदर गुन्ह्याचा तपास वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरिक्षक राहुल घाडगे करीत आहेत.

सदरची कामगीरी ही मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री. प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त परि.२ पुणे श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त लष्कर विभाग, पुणे श्री. दिपक निकम, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गिरिषकुमार दिघावकर, पोलीस निरिक्षक(गुन्हे) श्री. प्रदिप पवार, पोलीस उप निरिक्षक राहुल घाडगे, म.पोलीस उप-निरिक्षक ज्योती कुटे यांचे नेतृत्वाखाली, तपास पथकातील पोलीस अंमलदार महेश कदम, सोमनाथ बनसोडे, संदिप उकिर्डे, रमेश चौधर, सचिन मांजरे, लोकेश कदम, सागर हराळ, अल्का ब्राम्हणे, श्रीनिवास केंजळे, भगवान पाटोळे, रविंद्र कदम यांनी केली आहे.